दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालयात संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त विचार व्यक्त करताना प्रा. डॉ. अरविंद लाडोळे व उपस्थित मान्यवर.

Nagpur, Yavatmal-Today

---

तिघरक्त्र यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक प्रविन राने तथा ताई केवाडे, नलीनी बाष्टीकर, चंद्रकला साठे, पूष्पा काळे, वैशाली राठोड या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे संचालन संचीत चव्हान तर आभार रोशनी ठेंगरी यांनी मानले.

## मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

**शहर प्रतिनिधी /** २७ फेब्रुवारी

**दारव्हा** : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे २३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाद्वारे वैराग्यमूर्ती गाडगेबाबा जयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धा, परिसर स्वच्छता आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यांप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष जाधव तर प्रमुख



उपस्थितीमध्ये इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अरविंद लाडोळे, प्रा. रवी बोरकर, प्रा. संदीप भुरले, प्रा. नितीन भिंगारे, प्रा. कु. प्रियंका रुईकर, प्रा. फरहाना शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. प्रियंका रुईकर तर प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत तसेच आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संदीप भुरले यांनी मानले जयंतीनिमित्त कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.

ePaper देशोन्नती Thu, 28 February 2019 https://deshonnati.digitaleditio

---

लोकमत

## शाळा-महाविद्यालयांतून



## मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

दारव्हा - येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागातर्फे संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ.सुभाष जाधव होते. डॉ.अरविंद लाडोळे, रवी बोरकर, संदीप भुरले, प्रा.नितीन भिंगारे, प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.फरहान शेख उपस्थित होते. यावेळी डॉ.अरविंद लाडोळे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण डॉ.सुभाष जाधव यांनी केले. यावेळी वक्तृत्व स्पर्धा, परिसर स्वच्छतेचा कार्यक्रम घेण्यात आला. संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रियंका रुईकर, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संदीप भुरले यांनी मानले जयंतीनिमित्त कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

Hello Yavatmal
Page No. 3 Mar 12, 2019
Powered by: erelego.com

*Gadge Baba Birth Anniversary News Published in Sakal, Deshonnati & Lokmat*

# Regular Activity 2019-20

## Celebration of International Yoga Day



*Celebration of International Yoga Day*



सकाळ

# जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात

सकाळ वृत्तसेवा

**यवतमाळ, ता. २१ : जिल्ह्यात ठिकठिकाणी शुक्रवारी (ता. २१) आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये शाळा-महाविद्यालयांसह, विविध सेवाभावी संस्था, संघटना, योग वर्गाचे सदस्य व आबालवृद्ध सहभागी झाले होते.**

### मुंगसाजी महाविद्यालयात मार्गदर्शन

**दारव्हा :** मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय योगदिनासाठी योग प्रशिक्षिक म्हणून डॉ. अश्विनी भेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी योगासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये योग प्रशिक्षण घेताना योगाच्या आठ अवस्था कोणत्या व या अवस्थांची सुरवात कशाप्रकारे करावी, याचे मार्गदर्शन केले. तसेच योगासनामधील वेगवेगळ्या प्रकारची योगासनाची प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यामध्ये ताडासन, सुखासन, वक्रासन, मुक्त पवनासन, प्रार्थना, मानेचा व्यायाम, मेरुद व्यायाम, अर्ध बैठक आसन, हस्तपादासन, दंडासन, भद्रासन, त्रिकोणासन, शशांकासन, मकरासन, भुजंगासन, उत्तानपादासन, सेतुबंधासन, ध्यान, शवासन आदि आसनांचे प्रकार शिकविले. तसेच अनुलोम-विलोम व प्राणायाम यावरसुद्धा भर दिला. योग शिबिरात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह अनेकांनी योगाचे धडे गिरविले. या प्रशिक्षण शिबिराचे संचालन शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. सुनील डंभारे तर आभार रासेयोचे डॉ. शंकर सावंत यांनी मानले. शिबिरासाठी प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात प्रा. सुनील डंभारे, डॉ. प्रशांत बागेश्वर व डॉ. शंकर सावंत आदींसह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. तालुक्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद, माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये योग दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. अनेक शाळांमध्ये सकाळीच शिक्षकांसह विद्यार्थीही दाखल झाले. येथील तहसील कार्यालयातर्फे तहसीलदार अरुण शेलार यांचे सूचनेनुसार स्थानिक शिवाजी स्टेडियम येथे योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यासह तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्येही योग दिन साजरा करण्यात आला.

### वणीत पालिकेत योग

**वणी :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त वणी येथे विविध ठिकाणी योग साधनेचे वर्ग घेऊन योग दिन साजरा करण्यात आला. नगर पालिकेतर्फे पालिकाप्रांगणात पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व शिक्षकवृंदांसाठी योग वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. हा योगवर्ग योगशिक्षक संजय आस्कर यांनी घेऊन विविध प्राणायाम घेऊन शास्त्रशुद्ध योग करण्याचे प्रात्यक्षिक करून घेतले. नगर परिषदेचे अध्यक्ष तारेंद्र बोर्डे, उपमुख्याधिकारी कृष्णा देवरे, सभापती, नगरसेवक, कर्मचारी व शिक्षकवृंद सहभागी झाले होते. भारत स्वाभिमान ट्रस्ट व पतंजली योग सेवा समितीद्वारे येथील एस. बी. लॉनमध्ये योग दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शहरातील गणमान्य व्यक्ती, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

पहाटे ५:३० ते ७ या वेळात पार पडलेल्या योग वर्गात सहसंयोजक गुलाब खुसपुरे, योगशिक्षक लक्ष्मण इद्दे, रमेश बोबडे यांनी मार्गदर्शन केले.

### समर्थ विद्यालयात घाटंजी येथे योग दिन

**घाटंजी :** ५ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ४७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी यवतमाळ युनिट-श्री समर्थ विद्यालय घाटंजी येथे शालेय प्रांगणात सकाळी योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. व्यायाम, प्राणायाम आणि ध्यान याविषयी माहिती आणि प्रात्यक्षिकपर मार्गदर्शन सतीश रामगडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी ऑफिसर लक्ष्मण कानकाटे यांनी केले होते. यावेळी मुख्याध्यापिका ठाकूर, मांडे, जकाते, भवरे, राठोड, मदने, वैद्य, हेमके, बाशा व इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वसंतराव नाईक जैवतंत्रज्ञान विद्यालय

**यवतमाळ :** वसंतराव नाईक जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यवतमाळ येथे जागतिक योग दिवसाचे औचित्य साधून १७ ते २१ असे पाच दिवस योगाभ्यास घेऊन शुक्रवारी (ता. २१) समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र गाडे होते. डॉ. साहेबराव साखरे यांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून योगाभ्यासाचे धडे दिलेत. डॉ. धीरज वसुले, डॉ. रवींद्र सातभाई, डॉ. थांगोटे आदींसह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

### शिवाजी विद्यालय, यवतमाळ

**यवतमाळ :** शिवाजी विद्यालयात सकाळी सात वाजता शारीरिक शिक्षक मनोज येंडे यांच्या मार्गदर्शनात विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सामूहिक प्रार्थनेनंतर योगासनाचे विविध प्रकार केले. निरोगी जीवन जगण्यासाठी नियमित योगासने करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन उपस्थित मान्यवरांनी केले. यावेळी मुख्याध्यापिका सुहासिनी शेंडे, पर्यवेक्षक बी. एस. कापसे तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाचे धडे घेताना कर्मचारी व विद्यार्थी.

वणी : पालिकेच्या प्रांगणात योग करताना अधिकारी कर्मचारी.

आर्णी : योगाचे धडे देताना मार्गदर्शक विश्वास सवने.

### सायकलस्वारांनी घेतले योगाचे धडे

**आर्णी :** 'सायकल चालवा पर्यावरणाचे रक्षण करा', असा संदेश देणाऱ्या आर्णी सायकलिंगच्या सदस्यांनी शुक्रवारी (ता. २१)सकाळी सहा वाजता योग दिनाचे औचित्य साधून 'नियमित योग करा आणि निरोगी रहा' असा संदेश दिला. नियमित सायकल चालवून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सायकलींग क्लबच्या सदस्यांनी योगासनाचे धडे घेऊन सुदृढ आरोग्य राखण्यासाठी स्वतःसह इतरांनाही प्रोत्साहित केले आहे. रोगमुक्त होण्यासाठी नियमित योगासने करणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन विश्वास सवने यांनी सायकलींग क्लबच्या सदस्यांना केले.

Nagpur, Yavatmal-Today
22/06/2019 Page No. 4

*International Yoga Day News Published in Sakal*



## मुंगसाजी महाराज विद्यालय दारव्हा

**शहर प्रतिनिधी/**२२ जून

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथील आय. क्यू. ए. सी., शारीरिक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे . २१ जून रोजीआंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी योग प्रशिक्षिका म्हणून डॉ. सौ. अश्विनी भेंडे यांनी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा?यांना योगाचे धडे दिले. योग प्रशिक्षण घेताना योगाच्या आठ अवस्था कोणत्या व या अवस्थांची सुरुवात कशाप्रकारे करावी याचे मार्गदर्शन केले. तसेच योगासना मधील वेगवेगळ्या प्रकारची योगासनाची प्रात्यक्षिक त्यांनी करून दाखवले.

योग शिबिराच्या समाप्ती नंतर जीवनात योग हा किती महत्त्वाचा आहे. याची प्रत्यक्ष प्रचित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा?यांना आल्याचे दिसून आले. या प्रशिक्षण शिबिराचे संचालन शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. सुनील डंभारे तर आभार प्रदर्शन रासेयो डॉ शंकर सावंत यांनी केले. योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन हे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर विलास राऊत यांचे मार्गदर्शनात डॉ. प्रशांत बागेश्वर व डॉ. शंकर सावंत यांनी करू न शिबिराच्या यशस्वितेकरिता अथक परिश्रम घेतले. शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

ePaper देशोन्नती Sun, 23 June 20 https://deshonn

*International Yoga Day News Published in Deshonnati News paper*

## Kargil Victory Day



*Celebration ‘Kargil Victory Day’*

## Annabhau Sathe Birth & Lokmanya Tilak Death Anniversary




*Dr. Ajay Dube delivered speech on Annabhau Sathe Birth & Lokmanya Tilak Death Anniversary*

## Revolution Day




*Dr. Santosh Chatur delivered speech on Revolution Day*

## Independents Day & Swachata Pledge




*Student taken Swachata Pledge on*



सकाळ

# स्वच्छतेसाठी सर्वांनीच आग्रही असले पाहिजे

## प्रा. डॉ. संगीता घुईखेडकर : दारव्हा येथे रासेयोतर्फे स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा

दारव्हा, ता. १६ : मानवी जीवनामध्ये स्वच्छता फार महत्त्वाची आहे. लहानपणापासूनच विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सवय लावावी. स्वच्छतेच्या सवयीमुळे परिसरातील वातावरण प्रसन्न होऊन रोगमुक्त होते. रोग दूर पळतात. आरोग्य चांगले राहते. दुसरीकडे आरोग्य चांगले राहल्याने कार्यक्षमता वाढीस लागून विकासाला हातभार लागतो. विकासाला हातभार लावणाऱ्या स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांसह सर्वांनीच आग्रही राहिले पाहिजे, असे मत येथील तनिष्का गटप्रमुख प्रा. डॉ. संगीता घुईखेडकर यांनी व्यक्त केले.

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता पंधरवड्यात फोटो प्रेझेन्टेशनचे आयोजन करण्यात आले होते. या यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. संगीता घुईखेडकर बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. अजय दुबे, डॉ. सुभाष जाधव, प्रा. सुनील चकवे, प्रा. डॉ. संतोष चतुर आदींची उपस्थिती होती.

स्वच्छता पंधरवड्यादरम्यान अण्णा भाऊ साठे जयंती तर लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करून महाविद्यालय परिसरातील स्वच्छता करण्यात आली. परिसरात पडलेल्या पॉलिथिनच्या पिशव्या गोळा करणे, परिसर झाडून स्वच्छ करणे, आदी स्वच्छताविषयक कामे करण्यात आली. त्यानंतर येथील बसस्थानक तसेच डेपोच्या परिसरातील परिसर स्वच्छ करण्यात आला. वर्कशॉपमध्येही स्वच्छता करण्यात आली. येथील उपजिल्हा न्यायालय परिसरात गवत काढून परिसर झाडून स्वच्छता करण्यात आली.

महाविद्यालयासमोरील वसाहत परिसरात गवत काढणे, पॉलिथिनच्या पिशव्या गोळ्या करणे. त्यानंतर शहरातून स्वच्छता व वृक्षसंवर्धन रॅली काढण्यात आली. स्वच्छता विषयावर पोस्टर व निबंधस्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. शेवटच्या दिवशी स्वच्छता विषयावर सेमिनार व गट चर्चेचे आयोजन केले होते. सोबतच स्वच्छता विषयावर पोस्टर निबंध स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले. स्पर्धे नंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर प्रा. अख्तरुन्निसा कुरेशी यांच्यासह रासेयो स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

दारव्हा : स्वच्छतेची शपथ घेताना महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग.

Nagpur, Yavatmal-Today
17/09/2019 Page No. 2

*Swachata Pandharwada (1 To 15 August 2019) programmed News Published in Sakal Paper*



divyamarathi.com

दिव्य मराठी यवतमाळ, शुक्रवार, २० सप्टेंबर २०१९

स्वच्छता पंधरवडा • मुंगसाजी महाराज महाविद्यालात प्रा. डॉ. घुईखेडकर यांचे प्रतिपादन

# 'स्वच्छतेप्रती आग्रही असायलाच हवे'

प्रतिनिधी | दारव्हा

मानवी जीवनामध्ये स्वच्छता फार महत्त्वाची आहे. लहानपणापासूनच विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सवय लावावी. स्वच्छतेच्या सवयींमुळे परिसरातील वातावरण प्रसन्न होवून रोगमुक्त होते. रोग दूर पळतात. आरोग्य चांगले राहते. दुसरीकडे आरोग्य चांगले राहिल्याने कार्यक्षमता वाढीस लागून विकासाला हातभार लागतो. विकासाला हातभार लावणाऱ्या स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांसह सर्वांनीच आग्रही राहीले पाहिजे असे मत येथील प्रा. डॉ. संगीता घुईखेडकर यांनी येथे व्यक्त केले.

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता पंधरवड्यात फोटो प्रेझेंटेशनचे आयोजन करण्यात आले होते. या यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ संगीता घुईखेडकर बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. अजय दुबे, डॉ. सुभाष जाधव, प्रा. सुनील चकवे, प्रा. डॉ. संतोष चतुर आदींची उपस्थिती होती. स्वच्छता पंधरवडा दरम्यान अण्णाभाऊ साठे जयंती तर लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करून महाविद्यालय परिसर स्वच्छता, वर्ग खोल्यांची स्वच्छता, टॉयलेट स्वच्छता आदि स्वच्छता करण्यात आली. दुसरे दिवशी येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात गाजर गवत निर्मूलन, परिसरात पडलेल्या पॉलिथिनच्या पिशव्या गोळा करणे, परिसर झाडून स्वच्छ करणे आदि स्वच्छता केली. त्यानंतर येथील बसस्थानक स्वच्छ करणे, तसेच डेपोच्या परिसरातील परिसर स्वच्छ करणे, वर्कशॉप स्वच्छ करणे आदी स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर येथील उपजिल्हा न्यायालय परिसरात गवत काढणे, परिसर झाडणे आदि स्वच्छता केली, महाविद्यालयासमोरील वसाहत परिसरात गवत काढणे, पॉलिथिनच्या पिशवी गोळा करणे, परिसर झाडून स्वच्छ करणे आदि स्वच्छता केली. त्यानंतर शहरातून स्वच्छता व वृक्षसंवर्धन रॅली काढण्यात आली. विषयावर पोस्टर व निबंध स्पर्धेचे आयोजन केले. शेवटचे दिवशी स्वच्छता विषयावर सेमिनार व गट चर्चेचे आयोजन केले होते सोबतच स्वच्छता विषयावर पोस्टर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेनंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर प्रा. अख्तररुन्निसा कुरेशी यांचेसह रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

स्वच्छतेची शपथ घेताना मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे विद्यार्थी.

*Swachata Pandharwada (1 To 15 August 2019) programmed News Published in Daily Sakal Paper*

## Teachers Day Date on 5/9/2019




*Speech Delivered in Dr. Sunil Chawake on Teachers Day*

## NSS Day



*Dr. Sandip Bhurale speech delivered on NSS Day*



यवतमाळ | ४

बुधवार दि. २५ सप्टेंबर २०१९

# दारव्हा येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन

रासेयो दिन कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना मान्यवर

**प्रतिनिधी/** २४ सप्टेंबर

**दारव्हा** : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रासेयो दिनाचे आयोजन करण्यात आले होते. रासेयो दिनानिमित्त स्वच्छतेवर जनजागृती करण्यासाठी तसेच राष्ट्रीय सेवा योजना प्रति विद्यार्थ्यांमध्ये जागृतता निर्माण करण्यासाठी स्वच्छता जनजागृती व रासेयो उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कला शाखाप्रमुख डॉ. सुनील चकवे तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. खुशाल ढवळे, डॉ. संदीप भुरले, प्रा. रवि बोरकर, डॉ. संतोष चतुर आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. संदीप भुरले, प्रा. खुशाल ढवळे, प्रा. रवी बोरकर, डॉ. सुनील चकवे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सचिन राठोड तर प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी व आभार प्रदर्शन जयश्री शेंदूरकर हिने मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात डॉ. शंकर सावंत, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, कार्यक्रम अधिकारी प्रा कु. प्रियंका रुईकर प्रा कु. अख्तरुन्निसा कुरेशी व रासेयो स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

ePaper देशोन्नती Wed, 25 September 2019 https://deshonnati.digitaledition.in/c/43991602

*NSS Day News published in Deshonnati News Paper*

## Ghandi Birth Anniversary




*Dr. Vilas Raut Principal Worshiping Gandhi Image*

## Reading Inspiration Day & Dr. A.P.J Kalam Birth Anniversary




*Book Exhibition on Reading Inspiration Day & A.P.J Kalam Birth Anniversary*



# मुंगसाजी महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन

ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्‌घान कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर.

**प्रतिनिधी । दारव्हा**

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात दि. १५ ऑक्टोबर रोजी ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंती दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनामध्ये स्पर्धा परीक्षा आणि इतिहास या विषयांची पुस्तके ग्रंथप्रदर्शन मध्ये ठेवण्यात आली होती. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली.

याप्रसंगी विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव, डॉ. संगीता घुईखेडकर यांनी फीत कापून पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. ग्रंथप्रदर्शन वाचकांना ग्रंथालयापर्यंत घेऊन येण्याचा सगळ्यात चांगला मार्ग असून त्याद्वारे त्यास वाचनाची प्रेरणा मिळून, चोखंदळ वाचक तयार होतो. असे प्रतिपादन या उद्‌घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी व्यक्त केले. तसेच आपल्या उद्‌घाटनपर भाषणामध्ये संस्थेच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांनी डिजिटल युगात पुस्तक वाचनाच्या पद्धती बदलल्या आहेत. परंतु आजही पुस्तक वाचनाचे महत्त्व कायम आहे. ग्रंथ हा असा खजिना आहे की ज्याचा जितका उपयोग आपण करून घेऊ तितकेच आपण समृद्ध होत जाऊ, ग्रंथ आपल्या आयुष्याला दिशा देण्याचे काम करतात. नियमित वाचन केले तरच भावी पिढी सक्षम व सुजाण होईल. तरुण पिढीने पुस्तक वाचनाचा छंद जोपासला पाहिजे, वाचन संस्कृती रुजवण्यासाठी अशा पुस्तक प्रदर्शनाची खूप आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील कला शाखाप्रमुख डॉ. सुनील चकवे, डॉ. संतोष चतुर, डॉ. संदीप भुरले, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा.अमोल वाकोडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रूईकर, प्रा. कु. अख्तररून्नीसा कुरेशी, ग्रंथालय कर्मचारी गजानन इरवे, मनीष लांजेवार, विनोद इंगोले आदींची उपस्थिती होती.

ग्रंथ प्रदर्शनाच्या यशस्वी करता ग्रंथपाल प्रा.अमोल वाकोडे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

*Reading Inspiration Day & A.P.J Kalam Birth Anniversary*
*News Published in Daily Punyanagari News paper*



# धर्म . समाज . संस्था

divyamarathi.com — दिव्य मराठी यवतमाळ, बुधवार, २३ ऑक्टोबर २०१९

**वाचन प्रेरणा दिन** • डॉ. संगीता घुईखेडकर यांचे प्रतिपादन; मुंगसाजी महाविद्यालयात कार्यक्रम

## वाचन संस्कृती रुजवण्याची गरज

प्रतिनिधी । दारव्हा

ग्रंथ असा खजिना आहे की ज्याचा जितका उपयोग आपण करू तितकेच आपण समृद्ध होत जाऊ. ग्रंथ आयुष्याला दिशा देण्याचे काम करतात. नियमित वाचनाने भावी पिढी सक्षम व सुजाण होणार आहे. भविष्यासाठी वाचन संस्कृती रुजवण्याची गरज असल्याचे मत डॉ. संगीता घुईखेडकर यांनी येथे व्यक्त केले.

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटक म्हणून डॉ. संगीता घुईखेडकर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत तर अतिथी म्हणून डॉ. सुनील चकवे, डॉ. संतोष चतुर, डॉ. संदीप भुरले, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. अमोल वाकोडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत आदींची उपस्थिती होती. ग्रंथप्रदर्शनी वाचकांना ग्रंथालयापर्यंत घेऊन येण्याचा सगळ्यात चांगला मार्ग असून त्याद्वारे त्यास वाचनाची प्रेरणा मिळून, चोखंदळ वाचक तयार होतो, असे मत प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनात उपयुक्त पुस्तकांचा अवलंब करून प्रगती करावी. असे विचार आपल्या भाषणातून मान्यवरांनी यावेळी मांडले.

पुस्तक प्रदर्शनाच्या प्रसंगी सर्व मान्यवरांनी प्रदर्शनात असलेल्या पुस्तकांचे निरीक्षण केले. पुस्तक प्रदर्शन कार्यक्रमाला रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. अख्तररून्नीसा कुरेशी, ग्रंथालय कर्मचारी गजानन इरवे, मनीष लांजेवार, विनोद इंगोले आदींची उपस्थिती होती. पुस्तक प्रदर्शनाला विद्यार्थ्यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली. पुस्तक प्रदर्शनाच्या यशस्वितेसाठी ग्रंथपाल प्रा. अमोल वाकोडे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

दारव्हा येथे मुंगसाजी महाराज महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात.

*Reading Inspiration Day & A.P.J Kalam Birth Anniversary News Published in Divya Marathi*

## Constitution Day




*Dr. Vilas Raut, Principal Worshiping Dr. Ambedkar Photo*

## Mahaprinirvan Day



*Dr. Santosh Chatur & Other Worshiping Dr. Ambedkar Photo frame*

## AIDS Awareness Programme on the occasion of  Gadge Baba Death Anniversary




*Pravin Nagarale speech delivered on AIDS Awareness Programme*
*Gadge Baba Death Anniversary*

सकाळ

# मुंगसाजी महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना

## राष्ट्रीय सेवा योजनेचा पुढाकार; एड्स जनजागृतीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

**दारव्हा ता २ :** येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगे महाराज पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. अजय दुबे, उपजिल्हा रुग्णालयातील एड्स समुपदेशक प्रवीण नगराळे प्रामुख्याने उपस्थित होते. रेड रिबन क्लबच्या उद्घाटनानंतर बौद्धिक कार्यक्रमांमध्ये एड्स जनजागृतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



**दारव्हा : कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांच्यासह उपस्थित मान्यवर.**

प्रवीण नगराळे यांनी एड्सच्या संदर्भात असणाऱ्या गैरसमजुती, एड्स होण्याची कारणे आदी बाबींवर प्रकाश टाकला. एड्सची समाजाला लागलेली कीड दूर करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. संचालन सचिन राठोड यांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले. आभार प्रवीण सुलताने यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत, सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. अख्तररुन्निसा कुरेशी व स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

Nagpur, Yavatmal-Today
03/01/2020 Page No. 2

*AIDS Awareness Programme News published in Sakal News Paper*

**दिव्य मराठी विशेष** • संत गाडगे बाबा पुण्यतिथीदिनी क्लबची केली स्थापना

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात 'रेड रिबीन'

**प्रतिनिधी । दारव्हा**

शहरातील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात दि. २० डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आधारे संत गाडगे महाराज पुण्यतिथी व रेड रिबीन क्लबची स्थापना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यात्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रवीण नगराळे, एड्स समुपदेशक, उपजिल्हा रुग्णालय, दारव्हा उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अजय दुबे, डॉ. सुनील चकवे व एड्स समुपदेशक प्रवीण नगराळे यांनी रेड रिबीन क्लबच्या कार्यकारिणीचे उद्घाटन केले. त्यानंतर बौद्धिक कार्यक्रमांमध्ये सुरुवातीला गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण केला. एड्स जनजागृती संदर्भात आपले मनोगत व्यक्त करताना प्रवीण नगराळे यांनी एड्सच्या संदर्भात असणाऱ्या गैरसमजुती, एड्स होण्याची कारणे, एड्स रोगी बद्दल समाजात असणाऱ्या गैरसमजुती आदी बाबींवर प्रकाश टाकला व शेवटी एड्सची समाजाला लागलेली किड दूर करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कार्य करावे, असे आव्हान केले. डॉ. सुनील चकवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत व आभार प्रवीण सुलताने तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन राठोड यांनी केले. यशस्वितेकरिता डॉ. विलास राऊत व सचिव, डॉ. संगीता घुईखेडकर, डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. अख्तारुन्निसा कुरेशी व रासेयोच्या स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.



मुंगसाजी महाराज महाविद्यालयात रेड रिबीन क्लबची स्थापना.

*AIDS Awareness Programme News published in Sakal News Paper*
*Published in Divya Marathi*

**लोकमत**

# दारव्ह्यात रेड रिबीन क्लब स्थापन

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे संत गाडगे महाराज पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रेड रिबीन क्लबची स्थापना करण्यात आली.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.सुनील चकवे होते. उपप्राचार्य डॉ.अजय दुबे, उपजिल्हा रुग्णालयातील एड्स समुपदेशक प्रवीण नगराळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजन व हारार्पणाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर रेड रिबीन क्लबचे उद्घाटन करण्यात आले. नंतर बौद्धिक कार्यक्रमांमध्ये एड्स जनजागृतीबाबत मनोगत व्यक्त करताना प्रवीण नगराळे यांनी एड्सबाबत असणाऱ्या गैरसमजुती, एड्स होण्याची कारणे, एड्स रोगीबद्दल समाजात असणाऱ्या गैरसमजुती आदींवर प्रकाश टाकला. एड्सची समाजाला लागलेली कीड दूर करण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कार्य करावे, असे आवाहन केले.



व्यासपीठावर उपस्थित उपप्राचार्य डॉ.सुनील चकवे, प्रवीण नगराळे आदी.

डॉ.सुनील चकवे यांनी गाडगे महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यांनी समाजातील वाईट चालीरिती, रुढी, परंपरा नष्ट करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यामुळे त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा वसा घेऊन समाजातील एड्ससारखी अपप्रवृत्ती दूर करण्यास विद्यार्थ्यांनी समाजात जनजागृती करावी, असे आवाहन केले.

संचालन सचिन राठोड, प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत, तर आभार प्रवीण सुलताने यांनी मानले. यशस्वीतेकरिता प्राचार्य डॉ. विलास राऊत, सचिव डॉ.संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. अख्तरुन्निसा कोरेशी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Jan 02, 2020
Powered by: erelego.com

*AIDS Awareness programme news published in daily Lokmat News Paper*

## Subhash Chandra Bose Birth Anniversary



*Hon`ble Manikrao Thakare, Dr. sangitatai Ghukhedkar Secretary, Dr. Vilas Raut, Principal Mr. Pradip Salunkhe Tahnedar*



लोकमत

# स्वातंत्र्य लढ्यात नेताजींचे मोठे योगदान

**प्रदीप साळुंके । दारव्हा येथे सुभाषचंद्र बोस जयंती उत्साहात साजरी**

लोकमत न्यूज नेटवर्क

**दारव्हा :** देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे मोठे योगदान आहे. त्यांचे बलिदान देश विसरणार नाही, असे मत ठाणेदार प्रदीप साळुंके यांनी व्यक्त केले.

देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्सव समितीतर्फे येथील नेताजींच्या पुतळ्याजवळ नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर, मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत, अशोक काटकर, डॉ. मनोज राठोड, डॉ. सुनील चकवे, प्रा. सुभाष जाधव, प्रा. अजाबराव खंडारे, गणेश भोयर, अशोक पाटील, नोमान नबी, विजय रंगारी उपस्थित होते.

चैतन्य ग्रुपचे गणेश भोयर यांनी नेताजींचे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. नेताजींच्या पुतळ्याला हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थी बँड पथकाने मानवंदना दिली. संचालन हरिभाऊ काशीकर यांनी केले. पवन काशीकर, मिथून काशीकर, मुस्तफा पटेल, विरु काशीकर, सूरज निमकर आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला उपस्थित ठाणेदार प्रदीप साळुंके, प्राचार्य डॉ.विलास राऊत आदी.

Hello Yavatmal
Page No. 4 Jan 26, 2020
Powered by: erelego.com

*Subhash Chandra Bose Birth Anniversary in Lokmat News Paper*

## Republic Day




*Student Giving Republic Pledge*

## Shivaji Maharaj Birth Anniversary



*Celebration of Shiv Birth Anniversary*

## Mother Tongue Day




*Mother Tongue Day delivered speech By Dr. Sunil Chakave*

सकाळ

# मातृभाषा व्यवहाराचे सुलभ माध्यम

## डॉ. संतोष चतुर : दारव्हा येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात मातृभाषादिन

सकाळ वृत्तसेवा

**दारव्हा, ता. २३ : भाषा हे दैनंदिन व्यवहाराचे मुख्य माध्यम असून मातृभाषेतून साधला जाणारा व्यवहार हा सहज आकलनीय व सुलभ असतो. त्यामुळेच ज्ञान आदान-प्रदान करण्यासाठीसुद्धा मातृभाषेचा वापर व्हायला पाहिजे, त्यासाठी यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे मत प्रा. डॉ. संतोष चतुर यांनी व्यक्त केले.**

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयामध्ये मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मातृभाषा दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. संतोष चतुर हे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शंकर सावंत, डॉ. मनीष मोहरील, प्रा. प्रियंका रुईकर, डॉ. फरहाना शेख, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. नितीन भिंगारे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. चतुर म्हणाले, आंतरराष्ट्रीय स्तरावर मातृभाषा दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली तसेच भारतामध्येसुद्धा मानव संसाधन विभागाने मातृभाषा दिन साजरा करण्यात पुढाकार घेतला असून मातृभाषेतून साधला जाणारा व्यवहार हा सहज, आकलनीय व सुलभ असतो. याचे महत्त्व त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना पटवून दिले. मानव आपली भाषा कशी संपादित करतो, भाषेचे स्वरूप व उपयोग, भाषा संज्ञापन प्रणाली, यावर आपल्या भाषणातून त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मातृभाषेचे महत्त्व व फायदे स्पष्ट केले. डॉ. संदीप भुरले यांनीही आपल्या भाषणातून मातृभाषेचे ऐतिहासिक महत्त्व तथा दैनंदिन महत्त्व विशद केले. यावेळी मातृभाषा दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये परिसंवाद, वादविवाद स्पर्धा तसेच मराठी विभागातर्फे प्रकाशित करण्यात येणारे वसुंधरा पाक्षिका विमोचनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन श्रेया काळे हिने केले तर आभार वैष्णवी राठोड हिने मानले. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाला महाविद्यालयीन प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दारव्हा : मातृभाषा दिनानिमित्त विचार मांडताना प्रा. डॉ. संतोष चतुर व उपस्थित मान्यवर.

Nagpur, Yavatmal-Today
24/02/2020 Page No. 2

*Mother Tongue Day News Published in Sakal News Paper*

# दारव्हा येथे मातृभाषा दिन

**दारव्हा ■ शहर प्रतिनिधी**

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयामध्ये मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मातृभाषा दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मातृभाषेचे महत्त्व व फायदे स्पष्ट केले. डॉ. संतोष चतुर व डॉ. संदीप भुरले यांनीही आपल्या भाषणातून मातृभाषेचे ऐतिहासिक महत्त्व तथा दैनंदिन महत्व विशद केले. मराठी विभागातर्फे प्रकाशित करण्यात येणारे वसुंधरा पाक्षिकांकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन कु. श्रेया काळे हिने केले तर आभार प्रदर्शन कु. वैष्णवी राठोड हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता डॉ. शंकर सावंत तसेच डॉ. मनीष मोहरील, कु. प्रियंका रुईकर डॉ. फरहाना शेख, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. नितीन भिंगारे व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



ePaper देशोन्नती
Fri, 21 February 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/49226060

*Mother Tongue Day News Published in Deshonnati News Paper*

# मातृभाषा व्यवहाराचे सुलभ माध्यम

## डॉ. संतोष चतुर यांचे प्रतिपादन; मुंगसाजी महाराज महाविद्यालयात मातृभाषा दिन

**प्रतिनिधी** | दारव्हा

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयामध्ये मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मातृभाषा दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. संतोष चतुर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून आंतरराष्ट्रीय स्तरावर मातृभाषा दिन साजरा करण्याची घोषणा तसेच भारतामध्ये मानव संसाधन विभागाने मातृभाषा दिन साजरा करण्यास घेतलेला पुढाकार यावर भाष्य केले. यासोबतच मातृभाषेतून साधला जाणारा व्यवहार हा सहज आकलनीय व सुलभ असतो याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

मानव आपली भाषा कशी संपादित करतो, भाषेचे स्वरूप व उपयोग, भाषा संज्ञापन प्रणाली यावर आपल्या भाषणातून त्यांनी प्रकाश टाकला. भाषा हे दैनंदिन व्यवहाराचे मुख्य माध्यम असून मातृभाषेतून तो व्यवहार झाला तर अधिक सुलभता लाभते असे त्यांनी प्रतिपादित केले. याच बरोबर ज्ञान आदान-प्रदान करण्याकरिता सुद्धा मातृभाषेचा वापर व्हावा यावर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले. ज्ञानभाषा व मातृभाषा एक असावी असा त्यांचा कल होता. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मातृभाषेचे महत्त्व व फायदे स्पष्ट केले. डॉ. संदीप भुरले यांनीही आपल्या भाषणातून मातृभाषेचे ऐतिहासिक महत्त्व तथा दैनंदिन महत्व विशद केले. मातृभाषा दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये परिसंवाद, वाद विवाद स्पर्धा तसेच मराठी विभागातर्फे प्रकाशित करण्यात येणारे वसुंधरा पाक्षिकांकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन कु. श्रेया काळे हिने केले तर आभार प्रदर्शन कु. वैष्णवी राठोड हिने केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत तसेच डॉ. मनीष मोहरील, कु. प्रियंका रुईकर डॉ. फरहाना शेख, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. नितीन भिंगारे व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाकरिता महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. चतुर व अन्य मान्यवर.

*Mother Tongue Day News Published in Divya Marathi News Paper*

पुण्यनगरी ३

# मुंगसाजी महाराज विद्यालयात मातृभाषादिन

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**दारव्हा** : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयामध्ये मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मातृभाषादिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. संतोष चतुर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून आंतरराष्ट्रीयस्तरावर मातृभाषादिन साजरा करण्याची घोषणा तसेच भारतामध्ये मानव संसाधन विभागाने मातृभाषादिन साजरा करण्यास घेतलेला पुढाकार यावर भाष्य केले. मातृभाषेतून साधला जाणारा व्यवहार हा सहज आकलनीय व सुलभ असतो, याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी मातृभाषेचे महत्त्व व फायदे स्पष्ट केले. डॉ. संदीप भुरले यांनी मातृभाषेचे ऐतिहासिक व दैनंदिन महत्त्व विषद केले. मातृभाषादिनानिमित्त परिसंवाद, वादविवाद स्पर्धा घेण्यात आल्या.

यावेळी वसुंधरा पाक्षिकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन श्रेया काळे हिने केले तर आभार वैष्णवी राठोड हिने मानले. यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, डॉ. मनीष मोहरील, प्रियंका रुईकर, डॉ. फरहाना शेख, डॉ. खुशाल ढवळे, डॉ. नितीन भिंगारे आदींनी परिश्रम घेतले.

*Mother Tongue Day News Published in Punnyanagari News Paper*

## Guidance Programme on International Women Day




*Celebration of International Women Day*




*Short Play by the Students on 'Save Girl Child'*

# Regular Activity 2020-21

## International Yoga Day





*Staff and family members doing Yoga*





## Teachers Day



*Photopujan of Dr.  Sarvpalli Radhakrushnan*

## Gandhi Birth Anniversary



*Dr. Vilas Raut Worshiping Gandhiji Photo*

## Reading Inspiration Day & Dr. A.P.J. Abdul Kalam Birth Anniversary




*Dr. Vilas Raut & Staff Worshiping Dr. A.P.J Abduk Kalam Photo*

## Constitution Day




*Dr. Vilas Raut, Principal delivered speech on 'Constituent Day'*




*Dr. Manish Moharil, delivered speech on 'Constituent Day'*

## Shivaji Maharaj Birth Anniversary




*Dr. Vilas Raut, Principal & Staff Worshiping Shivaji Maharaj Statue*




Principal
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha Dist.Yavatmal